अर्जुनी गाव ठरले महाराष्ट्रातील पहिले सायबर शिक्षित गाव

डॉ. जॅस्मिन यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रमाणपत्र प्रदान

अर्जुनी / महान कार्य वृत्तसेवा

अर्जुनी (ता. कागल) गावांची महाराष्ट्रातील पहिले सायबर शिक्षित गाव म्हणून घोषणा करण्यात आली. यानिमित्त क्रीक हिल फौंडेशन पुणे आणि देवचंद कॉलेज अर्जुननगर यांच्या संयुक्त विद्यमाने सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा उपक्रमांतर्गत सायबर शिक्षित गाव प्रमाणपत्र प्रदान कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला.



कार्यक्रमाच्या प्रमुख अतिथी जि. प. च्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. जॅस्मिन यांच्या प्रमुख उपस्थितीत ग्रामपंचायत अर्जुनीला सायबर शिक्षित गावाचे प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले.

या कार्यक्रमास सौ. अनुपमा काटकर, गट विकास अधिकारी कुलदीप बोंगे, अजय शिर्के, पोलीस उपनिरीक्षक अनिकेत कुडले, प्रभारी प्राचार्य डॉ. आर. एम. साळुंखे, उपप्राचार्य डॉ. ए. एस. डोनर, अर्जुनी ग्रामपंचायत प्रशासक जे. एन. सातवेकर, ग्रामविकास अधिकारी प्रवीणसिंह सुळकुडे, तसेच ग्रामस्थ, शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

या संकल्पनेच्या यशस्वीतेसाठी प्रा. प्रशांत कुंभार व अन्य प्राध्यापकांचे मार्गदर्शन लाभले.